जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४४७ दिनांक - २०/०६/२०२३**

## गुन्हे शाखा,युनिट ०५ पुणे शहर

## अग्निशस्त्र व धारदार सु-यासह दोन गुन्हेगार जेरबंद,

दिनांक १९/०६/२०२३ रोजी युनिट-५,चे प्रभारी पोलीस निरीक्षक उल्हास कदम यांनी युनिटकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे वेगवेगळया टिम तयार करुन युनिट कार्यक्षेत्रात गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करणे कामी रवाना केल्या. त्यादरम्यान पोलीस पथकाला बातमी मिळाली की, शेवाळेवाडी, बस डेपोचे गेटजवळ एक इसम अग्निशस्त्रासह वावरत असुन तो काहीतरी गंभीर गुन्हा करण्याचे तयारीत आहे वगैरे माहिती मिळाली. त्याप्रमाणे संशयित इसम नामे **मोहन मारुती गोरे वय १९ वर्षे रा. खोरी वस्ती, गणपती मंदिराजवळ, साईनगर, सिंहगड रोड, हिंगणे खुर्द पुणे** यास शिताफीने पकडुन ताब्यात घेतले, त्यावेळी त्याचे कब्जात **एक देशी बनावटीचे पिस्टल व एक राऊंड असे अग्नीशस्त्र** स्वतःची दहशत निर्माण करणेकामी वापरत असल्याचे आढळुन आले. म्हणुन त्यास अग्निशस्त्रासह ताब्यात घेऊन त्याचेविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे कारवाई केली. नमुद आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेविरुध्द सन २०२२ मध्ये खुनाचे प्रयत्न सारखे दोन गंभीर गुन्हे दाखल आहेत.

तसेच दि.१९/०६/२०२३ रोजी नमुद पेट्रोलिंग दरम्यान दुस-या टिमला मिळालेल्या बातमीवरुन संशयित इसम नामे **विशाल किशोर पुरबिया वय २२ वर्षे रा. जुना म्हाडा कॉलणी, बिल्डींग नंबर १६, रुम नं. १०, वैदवाडी हडपसर पुणे** हा एक स्टिलचा **धारदार सुरा** हा बेकायदेशिररित्या कोणता तरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने स्वतःचे कब्जात वावरत असताना मिळून आल्याने त्याचेविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम- ४ (२५) व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील दोन्ही इसमांवर वेगवेगळे दोन गुन्हे हडपसर पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आले असुन अधिक तपास चालु आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,युनिट-५,चे पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम,सहायक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर,पोलीस अमंलदार रमेश साबळे,प्रताप गायकवाड,प्रमोद टिळेकर,विनोद शिवले,अकबर शेख,राहुल ढमढेरे यांनी केलेली आहे.



महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
गुन्हे शाखा युनिट-५, पुणे शहर